भारतीय रिझर्व्ह बँक

RESERVE BANK OF INDIA

www.rbi.org.in

आरबीआय/2019-20/01
डीसीएम (एफएनव्हीडी) जी-1/16.01.05/2019-20 जुलै 1, 2019

अध्यक्ष/व्यवस्थापकीय संचालक/सीईओ
सर्व बँका आणि
सर्व राज्यांचे ट्रेझरी संचालक

महोदय/महोदया,

**महापरिपत्रक - खोट्या नोटा ओळखणे व जप्त करणे**

खोट्या नोटा ओळखणे व जप्त करण्यासंबधाने, जुलै 2, 2018 पर्यंत दिल्या गेलेल्या एकत्रित केलेले आमचे महापरिपत्रक,डीसीएम (एफएनव्हीडी) जी-1/16.01.05/2018-19 दि.जुलै 2, 2018 चा कृपया संदर्भ घ्यावा. त्यानंतर हे महापरिपत्रक, आतापर्यंत दिल्या गेलेल्या सुचना समाविष्ट करुन अद्ययावत करण्यात आले असून ते आरबीआयच्या www.rbi.org.in. ह्या वेबसाईटवरही टाकण्यात आले आहे.

आरबीआयने ह्या विषयावर दिलेल्या परिपत्रकांमधील सुचना एकत्रित करुन हे महापरिपत्रक तयार करण्यात आले असून त्या सुचना ह्या परिपत्रकाच्या तारखेसही जारी असणार आहेत.

आपला विश्वासु,

(मानस रंजन मोहंती)
मुख्य महाव्यवस्थापक

सोबत : महापरिपत्रक

अनुक्रमणिका


| परिच्छेद क्र. | तपशील |
|---|---|
| 1 | खोट्या नोटा जप्त करण्याचे अधिकार |
| 2 | खोट्या नोटा ओळखणे |
| 3 | खोट्या नोटा जप्त करणे |
| 4 | भरणा करणाराला पावती देणे |
| 5 | खोट्या नोटा ओळखणे – पोलिस व इतर विभागांना कळविणे |
| 6 | काउंटर्सवर देण्यापूर्वी, एटीएममध्ये ठेवण्यापूर्वी आणि भारतीय रिझर्व्ह बँकेच्या इश्यु ऑफिसेसना पाठवण्यापूर्वी बँक नोटांची तपासणी |
| 7 | नोडल बँक ऑफिसर नेमणे |
| 8 | बँकेच्या हेड ऑफिसमध्ये खोट्या नोटा सावधानता कक्ष स्थापन करणे |
| 9 | अल्ट्राव्हायोलेट दिवा व इतर पायाभूत सोयी उपलब्ध करणे |
| 10 | आरबीआय / सरकारला माहिती कळविणे |
| 11 | पोलिस प्राधिकरणाकडून मिळालेल्या खोट्या नोटांचे जतन |
| 12 | खोट्या नोटा ओळखणे  कर्मचा-यांना प्रशिक्षण देणे |
|  | जोडपत्र 1 |
|  | जोडपत्र 2 |
|  | जोडपत्र 3 |
|  | जोडपत्र 4 |
|  | जोडपत्र 5 |
|  | जोडपत्र 6 |
|  | जोडपत्र 7 |
|  | जोडपत्र 8 |

**भारतीय रिझर्व्ह बँक**
**चलन व्यवस्थापन विभाग**
**महापरिपत्रक - 2018-19**

**खोट्या नोटा ओळखणे व जप्त करणे**

**परिच्छेद 1 - खोट्या नोटा जप्त करण्याचे अधिकार**

पुढील संस्था खोट्या नोटा जप्त करु शकतात -

1. सर्व बँका
2. सर्व ट्रेझरीज व सब-ट्रेझरीज
3. भारतीय रिझर्व्ह बँकेची इश्यु कार्यालये

**परिच्छेद 2 - खोट्या नोटा ओळखणे**

काऊंटरवर सादर केलेल्या, नोटा खरेपणाबाबत यंत्राद्वारे मशीनद्वारे तपासल्या जाव्यात

बँक ऑफिस/धनकोष येथे थेट एकगठ्ठा सादर करणारांकडून मिळालेल्या बँक नोटाही मशीनद्वारे तपासल्या जाव्यात.

काऊंटर किंवा बॅंक ऑफिस/करन्सी चेस्टमध्ये मिळालेल्या/सापडलेल्या खोट्या नोटांसाठी ग्राहकाच्या खात्यात कोणतीही जमा करु नये.

कोणत्याही परिस्थितीत खोट्या नोटा, त्या सादर करणाराला परत दिल्या जाऊ नयेत किंवा बँक शाखा/ट्रेझरीद्वारे नष्ट केल्या जाऊ नयेत. बँकांना सापडलेल्या खोट्या नोटा जप्त न केल्या जाणे हे, संबंधित बँक, खोट्या नोटांचा प्रसार हेतुपूर्वक करत असल्याचे समजले जाईल, आणि त्यासाठी दंड लावला जाईल.

**परिच्छेद 3 - खोट्या नोटा जप्त करणे**

खोट्या म्हणून ओळखल्या गेलेल्या नोटांवर, नमुन्यानुसार (जोडपत्र 1) 'काऊंटरफिट नोट' शिक्का मारुन जप्त केल्या जाव्यात. जप्त केलेल्या प्रत्येक नोटेची सविस्तर माहिती एका वेगळया रजिस्टरमध्ये साक्षांकनासह नोंद करुन ठेवली जावी.

**परिच्छेद 4 - सादरर्कत्याला पावती देणे**

एखाद्या बँक शाखेच्या काऊंटरवर/बॅंक ऑफिस व करन्सी चेस्ट किंवा ट्रेझरी मध्ये सादर केलेली नोट खोटी असल्याचे दिसून आल्यास वरील परिच्छेद 3 मध्ये दिल्याप्रमाणे तिच्यावर शिक्का मारुन, विहित केलेल्या नमुन्यात (जोडपत्र 2) त्याबाबतची पावती सादरर्कत्याला देण्यात यावी. ह्या पावतीवर धावता अनुक्रमांक असावा आणि त्यावर रोखपाल व सादरर्कत्याने साक्षांकन करावे. जनतेच्या माहितीसाठी अशा आशयाची नोटिस कार्यालये/शाखांमध्ये ठळकपणे प्रदर्शित केली जावी. सादरकर्ता त्यावर प्रतिस्वाक्षरी/काऊंटर-साईन करण्यास नकार देत असला तरीही अशी पावती दिली जावी.

**परिच्छेद 5– खोट्या नोटा ओळखणे  पोलिस व अन्य खात्यांना कळविणे**

खोटी नोट सापडल्याचा प्रसंग पोलिसांना कळवितेवेळी पुढील कार्यरीत अवलंबिली जावी. केवळ एकाच व्यवहारात 4 खोट्या नोटा सापडल्यास, नोडल बँक ऑफिसरने, पोलिस प्राधिकरणाकडे किंवा नोडल पोलिस स्टेशनकडे, (जोडपत्र 3) मध्ये दिल्यानुसार एकत्रित अहवाल, महिन्याच्या अखेरीस शंकास्पद खोट्या नोटांसह सादर करावा.

केवळ एकाच व्यवहारात 5 किंवा अधिक खोट्या नोटा सापडल्यास, **ताबडतोब** नोडल बँक ऑफिसरने स्थानिक पोलिस प्राधिकरणाकडे किंवा नोडल पोलिस स्टेशनकडे, त्या खोट्या नोटा, एफआयआर (जोडपत्र 4) दाखल करुन तपासासाठी पाठवाव्यात.  एकत्रित केलेल्या मासिक अहवालाची/एफआयआरची एक प्रत, ह्या बँकेच्या मुख्य कार्यालयातील फॉर्जड् नोट व्हिजिलन्स सेलकडे (फक्त बँकांच्या बाबतीत) व ट्रेझरीच्या बाबतीत रिझर्व्ह बँकेच्या संबंधित इश्यु ऑफिसकडे पाठवावी.

संबंधित पोलिस प्राधिकरणाकडे पाठविलेल्या नोटा तसेच मासिक एकत्रित अहवाल व एफआयआर ह्यांच्याबाबत त्या पोलिस प्राधिकरणाकडून पोच घेतली जावी. पोलिसांकडे पाठविलेल्या खोट्या नोटा इन्शुअर्ड पोस्टने पाठविल्या असल्यास त्याबाबतची पोलिसांकडून मिळालेली पोचपावती न चुकता घेऊन रेकॉर्डमध्ये ठेवली जावी. पोलिसांकडून मिळालेल्या पोचपावतीसंबंधाने योग्य असा पाठ्पुरावा केला जाणे आवश्यक आहे. मासिक एकत्रित विवरणपत्र स्वीकारण्यात/एफआयआर तयार करण्यात पोलिसांच्या उदासीनतेमुळे कार्यालये/शाखा ह्यांना अडचणी येत असल्यास, खोट्या बँक नोटांच्या प्रकरणांचा तपास करण्याबाबत समन्वय करण्यासाठी नेमलेल्या, पोलिस प्राधिकरणाच्या नोडल ऑफिसरशी सल्ला मसलत करुन त्या सोडवाव्यात. नोडल पोलिस स्टेशन्सची यादी रिझर्व्ह बँकेच्या संबंधित प्रादेशिक कार्यालयांकडून मिळविता येईल. खोट्या नोटांचा प्रसार करणा-या लोकांची ओळख पटविण्यासाठी, बँकेचा हॉल/परिसर व काऊंटर्स ह्या जागा सीसीटीव्हीच्या नजरेखाली ठेवण्यास बँकांना सांगण्यात येत आहे. अशा नोटा ओळखण्याबाबतचे नमुने/साचे व कल ह्यावरही बँकांनी देखरेख ठेवावी आणि असे संशयास्पद साचे/कल आरबीआय/पोलिस प्राधिकरणांच्या नजरेस ताबडतोब आणावेत.

पोलिस, आरबीआय इत्यादींना, खोट्या नोटांचा शोध व कळविणे ह्याबाबतची बँकांनी केलेल्या प्रगतीवर निरनिराळया राज्य स्तरीय समित्यांच्या (उदा. स्टेट लेव्हल बँकर्स कमिटी (एसएलबीसी) स्टँडिंग कमिटी ऑन करन्सी मॅनेजमेंट (एससीसीएम), स्टेट लेव्हल सिक्युरिटी कमिटी (एसएलएससी) इ.) सभांमध्ये नियमितपणे चर्चा केली जावी

खाली परिच्छेद 10 मध्ये दिल्याप्रमाणे, शाखा व ट्रेझरी ह्यामध्ये सापडलेल्या खोट्या भारतीय नोटांसंबंधीची माहिती, रिझर्व्ह बँकेच्या इश्यु ऑफिसेसना पाठवावयाच्या मासिक अहवालात समाविष्ट केली जावी.

भारतीय दंड संहितेमध्ये दिलेल्या 'काउंटर फिटिंग' च्या व्याख्येमध्ये, एखाद्या विदेशी सरकारच्या प्राधिकरणाने दिलेल्या चलनी नोटाही समाविष्ट आहेत. पोलिस व सरकारी संस्थांकडून मत देण्यासाठी संशयास्पद विदेशी चलन नोटा आल्यास, ते प्रकरण सीबीआय, नवी दिल्ली च्या इंटरपोल विंगकडे त्यांच्याशी  सल्ला-मसलत करुन पाठविण्यास सांगितले जावे.

भारत सरकारने बेकायदेशीर कार्यकृती (प्रतिबंध) अधिनियम (युएपीए) 1967 खाली, उच्च दर्जाच्य नकली भारतीय चलन गुन्ह्यांचे अन्वेषण नियम 2013 तयार केले आहेत. ह्या अधिनियमाच्या तिस-या शेड्युलमध्ये, उच्च दर्जाची नकली/बनावट चलनी नोट ची व्याख्या दिली आहे. उच्च दर्जाच्या नकली भारतीय नोटांचे उत्पादन करणे, तस्करी करणे किंवा प्रसार करणे ह्या कार्यकृती, युएपीए 1967 च्या कक्षेखाली आणन्यात आल्या आहेत.

**परिच्छेद 6 – काउंटर्सवर देण्यापूर्वी, एटीएममध्ये ठेवण्यापूर्वी आणि रिझर्व्ह बँकेच्या इश्यु ऑफिसेसना पाठवण्यापूर्वी बँक नोटांची तपासणी**

बँकांनी त्यांच्या रोख रकमेबाबतचे व्यवस्थापन अशा प्रकारे ठेवावे की रु. 100 व त्यापेक्षा अधिक किंमतीच्या नोटा, त्यांच्या खरेपणाबाबत यंत्राद्वारे तपासल्या गेल्याशिवाय पुनः प्रसारणासाठी देण्यात येणार नाहीत. दैनंदिन रोख रकमेचे आकारमान कितीही असले तरी, ह्या सूचना सर्व बँक शाखांना लागु असतील.  ह्याचे पालन न केले जाणे हे, रिझर्व्ह बँकेच्या निर्देश क्र.3158/09.39.00 (पॉलिसी)/2009-10 दि.नोव्हेंबर 19, 2019 चे  उल्लंघन समजण्यात येईल.

एटीएममधून खोट्या नोटा मिळाल्या असल्याच्या तक्रारी टाळण्यासाठी आणि खोट्या नोटांच्या प्रसारावर आळा घालण्यासाठी, एटीएममध्ये नोटा ठेवण्यापूर्वी सुयोग्य अशी सुरक्षा/तपासणी करण्याची व्यवस्था ठेवली जाणे अत्यावश्यक आहे. एटीएममार्फत खोट्या नोटा दिल्या जाणे हे, संबंधित बँकेद्वारे खोट्या नोटांचा प्रसार करण्याचा प्रयत्न केल्याचे समजले जाईल.

चेस्टमधील प्रेषणांमध्ये खोट्या नोटा सापडणे हे देखील संबंधित चेस्ट शाखा, खोट्या नोटा-प्रसारणात जाणीवपूर्वक गुंतल्या असल्याचे समजले जाईल व त्याबाबत खास पोलिस-तपास केला जाईल व संबंधित चेस्टचे काम प्रलंबित केले जाणे ह्यासारखी कारवाई केली जाऊ शकेल.

अशा नोटांच्या नोशनल-मूल्यापर्यंतच्या भरपाईसह, त्या खोट्या नोटांच्या नोशनल मूल्याच्या 100% एवढा दंड पुढील परिस्थितीत लावला जाऊ शकतो.

(अ) बँकेने, केलेल्या मळक्या नोटांच्या प्रेषणात खोट्या नोटा सापडल्यास

(ब) आरबीआयने केलेल्या तपासणी/ऑडिटमध्ये, एखाद्या बँकेच्या करन्सी चेस्ट शिल्लकांमध्ये खोट्या नोटा सापडल्यास डीपीएसएस.सीओ.ओडी.क्र.1916/06.07.011/2018-19 दि. मार्च 7, 2019 अन्वये, (अ) चलन हाताळणे आणि (ब) एटीएम्स साठीचा सायबर सिक्युरिटी साचा ह्या संबंधाने बँकांना लागु असलेली सर्व मार्गदर्शक तत्वे, सुरक्षा उपाय, मानके व नियंत्रण उपाय, डब्ल्युएलए ऑपरेटर्सनाही लागु असतील.

**परिच्छेद 7 नोडल बँक ऑफिसर नेमणे**

प्रत्येक बँकेने, जिल्हा-निहाय, एका नोडल बँक ऑफिसरची नेमणुक करावी व त्याबाबत रिझर्व्ह बँकेच्या संबंधित प्रादेशिक कार्यालयाला व पोलिस-प्राधिकरणाला अधिसूचित करावे. वरील परिच्छेद 5 मध्ये दिल्यानुसार खोट्या नोटा सापडल्याची सर्व प्रकरणे नोडल बँक ऑफिसर मार्फतच कळविली जावीत. खोट्या नोटा शोधण्यासंबंधी, नोडल बँक ऑफिसर एक संपर्क स्थान म्हणून कार्य करील.

**परिच्छेद 8 – बँकेच्या हेड ऑफिसमध्ये खोट्या नोटा दक्षता कक्ष स्थापन करणे**

प्रत्येक बँक तिच्या मुख्य कार्यालयात पुढील कार्यांसाठी एक खोट्या नोटा दक्षता कक्ष (एफएनव्ही) स्थापन करील.

1. रिझर्व्ह बँकेने खोट्या नोटांसंबंधाने दिलेल्या सूचना बँक शाखांना कळविणे. ह्या सूचनांच्या पालनावर देखरेख ठेवणे. अशा खोट्या नोटा सापडण्यावरील माहिती एकत्रित करुन ती, रिझर्व्ह बँक व एफआययु-इंड आणि राष्ट्रीय गुन्हे अभिलेख विभाग (एनसीआरबी) ह्यांचेकडे विद्यमान सुचनांनुसार पाठविणे. पोलिस प्राधिकरणे/नोडल अधिकारी ह्यांचेकडे पाठविलेल्या खोट्या नोटांच्या प्रकरणांचा पाठपुरावा करणे.
2. अशी एकत्रित केलेली माहिती बँकेच्या सीव्हीओला देणे आणि त्याला/तिला काउंटरवर दिलेल्या/स्वीकारलेल्या खोट्या नोटांच्या प्रकरणांची माहिती कळविणे.
3. तूट/सदोष/खोट्या नोटा आढळून येतात अशा करन्सी चेस्टमध्ये नियतकालिक आकस्मिक तपासणी करणे.
4. सर्व करन्सी चेस्ट/बँक ऑफिसेस मध्ये ठेवलेल्या, सुयोग्य क्षमतांच्या नोट-सॉर्टिंग मशीन्सच्या कार्यवाहीची खात्री करुन घेणे, आणि खोट्या नोटा ओळखण्यावर जवळून नजर ठेवून त्याबाबतचे रेकॉर्ड ठेवले जात आहे ह्याबाबत खात्रीकरून घेणे. एटीएम्स मध्ये टेवलेल्या काउंटर्सवर दिल्या जाणाऱ्या बँक नोटा, ह्या योग्य प्रकारे निवडलेल्या व मशीन द्वारे तपासलेल्याच असतील ह्याची खात्री करून घेणे आणि नोटांवर प्रक्रिया केली जात असतांना तसेच त्यांची ने-आण करीत असतांनाही आकस्मिक तपासणी सह सुयोग्य अशा सुरक्षा-उपाय ठेवले असल्याची खात्री करून घेणे.

एफएनव्ही कक्ष, तिमाही धर्तीवर, वरील बाबींसंबंधाने अहवाल तयार करुन, तो, मुख्य महाव्यवस्थापक, चलन व्यवस्थापन विभाग, भारतीय रिझर्व्ह बँक, केंद्रीय कार्यालय, अमर बिल्डिंग, 4था मजला, सर पी. एम. रोड, फोर्ट, मुंबई – 400 001 ह्यांना, ईएमेल आणि तो एफएनव्ही कक्ष रिझर्व्ह बँकेच्या ज्या प्रादेशिक कार्यालयाच्या अधिकार क्षेत्राखाली येतो त्याच्या इश्यु ऑफिसकडे, संबंधित तिमाही संपल्याच्या पंधरा दिवसांच्या आत पाठवील. हा अहवाल ईमेलने पाठवावयाचा आहे. हार्ड कॉपी पाठविण्याची आवश्यकता नाही.

एफएनव्ही कक्षांच्या पत्त्यांचे रेकॉर्ड अद्यावत करण्यासाठी, ती बँक विहित नमुन्यात (जोडपत्र 5), 1 जुलै रोजी असलेला तपशील रिझर्व्ह बँकेला दर वर्षी ई-मेलने पाठवील. हार्ड कॉपी पाठविण्याची गरज नाही.

**परिच्छेद 9 – अल्ट्रा व्हायोलेट दिवा व इतर पायाभूत सोयी उपलब्ध करणे**

खोट्या नोटा शोधण्यास मदत व्हावी ह्यासाठी सर्व बँक शाखा/ बँक ऑफिसेस ह्यात अल्ट्रा व्हायोलेट लँप व इतर सुयोग्य बँक नोट सॉर्टिंग/डिटेक्शन साधने असावीत. ह्याशिवाय सर्व करन्सी चेस्टमध्ये, सत्यांकन, प्रक्रिया व निवड करणारी मशीन्स असावीत व त्यांचा जास्तीत जास्त उपयोग केला जावा. अशी मशीन्स, रिझर्व्ह बँकेने, विहित केलेल्या 'नोट ऑथेंटिकेशन अँड फिटनेस सॉर्टिंग पॅरामीटर्स' ना अनुसरुन असावीत.

सर्व बँकांनी, नोट सॉर्टिंग मशीन्समार्फत प्रक्रिया केलेल्या नोटा व सापडलेल्या खोट्या नोटांची दैनंदिन नोंद ठेवावी.

तसेच बँकांनी जनतेच्या उपयोगासाठी किमान एक काउंटिंग मशीन (दोन डिसप्ले असलेले) उपलब्ध करुन द्यावे.

**परिच्छेद 10 – आरबीआय/एनसीआरबी/एफआययु - आयएनडी ह्यांना माहिती कळविणे.**

सर्व बँक शाखांद्वारे बँकेच्या सर्व शाखांनी, त्यांना सापडलेल्या खोट्या नोटांबाबतची माहिती, दरमहा, विहित नमुन्यात सादर करावी. महिन्याभरात बँक शाखांमध्ये आढळलेल्या खोट्या नोटांच्या माहितीचे एक विवरणपत्र (जोडपत्र 6) तयार केले जावे आणि ते रिझर्व्ह बँकेच्या संबंधित इश्यु ऑफिसकडे, पुढील महिन्याच्या 7 तारखेच्या आत पोहोचेल असे पाठविले जावे.

प्रिव्हेंशन ऑफ मनी लाँडरिंग (रेकॉर्ड ठेवणे) सुधारणा नियमावलीच्या नियम 8(1) खाली बँकांच्या प्रिन्सिपल आफिसर्सनी, ख-या नोटा म्हणून खोट्या नोटा वापरल्या गेल्या आहेत अशा रोखीने केलेल्या व्यवहारांबाबतची माहिती, संचालक, एफआययु - आयएनडी, फायनान्शियल इंटलिजन्स युनिट-इंडिया, 6 वा मजला, हॉटेल सम्राट, चाणक्यपुरी, नवी दिल्ली 110 021 ह्यांचेकडे ती माहिती **एफआयएननेट पोर्टलवर अपलोड** करुन, पुढील महिन्याच्या 15 तारखेच्या आत कळविणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे, खोट्या नोटा सापडण्यावरील माहिती, राष्ट्रीय गुन्हे अभिलेख विभाग, नवी दिल्ली **ह्यांच्या वेबसाईटवरील**, वेब-एनेबल्ड सॉफ्टवेअरवर अपलोड करावयाची आहे.

**परिच्छेद 11 पोलिस प्राधिकरणाकडून मिळालेल्या खोट्या नोटांचे जतन**

पोलिस प्राधिकरणे/कोर्ट ह्यांच्याकडून परत मिळालेल्या सर्व खोट्या नोटा, त्या बँकेच्या सुरक्षा कोठडीत जतन केल्या जाव्यात व संबंधित बँकेने त्याचे रेकॉर्ड ठेवावे. बँकेच्या एफएनव्ही कक्षानेही, अशा खोट्या नोटांबाबत, शाखा-निहाय असे एकत्रित रेकॉर्ड ठेवावे.

शाखांमधील खोट्या नोटांचे सहामाही धर्तीवर (31 मार्च व 30 सप्टेंबर) संबंधित शाखेच्या प्रभारी अधिकाऱ्याद्वारे सत्यांकन (पडताळणी) केले जावे. पोलिस प्राधिकरणांकडून त्या नोटा परत मिळाल्याच्या तारखेपासून तीन वर्षांपर्यंत जपून ठेवण्यात याव्यात.

त्यानंतर ह्या नोटा, त्याबाबतच्या संपूर्ण माहितीसह, रिझर्व्ह बँकेच्या संबंधित इश्यु कार्यालयाकडे पाठविल्या जाव्यात.

कोर्टाचा विषय असलेल्या खोट्या नोटा, कोर्टाचा निकाल दिला गेल्यानंतरही, संबंधित शाखेत, तीन वर्षेपर्यंत जतन केल्या जाव्यात.

**परिच्छेद 12 खोट्या नोटा ओळखणे - कर्मचा-यांना प्रशिक्षण**

बँक-शाखा, करन्सी चेस्ट आणि ट्रेझरी/सब-ट्रेझरी मधील रोकड हाताळणाऱ्या कर्मचाऱ्यांना बँक नोटांची सुरक्षा-लक्षणे संपूर्णपणे अवगत असणे आवश्यक आहे.

खोट्या नोटा ओळखण्यास शाखांमधील कर्मचाऱ्यांना शिक्षित करण्यासाठी, सर्व बँक नोटांचे डिझाईन व सुरक्षा-लक्षणे (**जोडपत्र 7** मध्ये दिल्यानुसार) सर्व बँक/ट्रेझरींना देण्यात आली आहेत व ती जनतेच्या माहितीसाठी शाखांमध्ये ठळकपणे प्रदर्शित करण्याबाबत सांगण्यात आले आहे. 2005-06 मालिकेतील बँक नोटांची पोस्टर्स देखील, बँक शाखांना त्यांच्या शाखांमध्ये प्रदशिर्त करण्यासाठी पुरविण्यात आली आहेत. 2000, 500, 200, 100, 50, 20 व 10 मूल्याच्या नवीन डिझाईनची सुरक्षा लक्षणांचा तपशील लिंक http://www.paisaboltahai.rbi.org.in वर उपलब्ध आहे. इतर बँक नोटांचा तपशील वरील लिंकवरील 'नो युवर बँक नोट्स' खाली उपलब्ध आहे.

खोट्या नोटा सादर/स्वीकार करतेवेळीच त्या ओळखता येण्यात मदत व्हावी ह्यासाठी, नियंत्रक कार्यालये/प्रशिक्षण केंद्रे ह्यांच्याद्वारे, बँक कर्मचा-यांसाठी, नोटांच्या सुरक्षा लक्षणांवरील कार्यक्रम आयोजित केले जावेत. रोख रकमा हाताळणा-या सर्व बँक कर्मचा-यांना ख-या भारतीय बँक नोटांच्या लक्षणांबाबत, प्रशिक्षित केले गेले असल्याची खात्री बँकांनी करुन घ्यावी. रिझर्व्ह बँक ह्याबाबत शैक्षणिक मदत व साहित्य पुरवील.

**जोडपत्र – 1**
**(परिच्छेद क्र. 3)**

निरनिराळी सुरक्षा लक्षणे/पॅरामीटर्स ह्यांची तपासणी करुन, खोटी नोट ठरविलेल्या प्रत्येक बँक नोटेवर काऊंटरफिट बँक नोट असा शिक्का मारला जाईल. ह्यासाठी, **5 सेमी x 5 सेमी** अशा समान आकाराचा व पुढील शब्द असलेला शिक्का वापरला जाईल.

| |
|---|
| काऊंटरफिट नोट इंपाऊंडेड<br><br>बँक/ट्रेझरी/सब ट्रेझरी –<br><br>शाखा/करन्सी चेस्ट –<br><br>सही<br><br>तारीख |

**जोडपत्र 2**
**(परिच्छेद 4)**

**नमुना – खोट्या नोटा सादर करणाराला द्यावयाची पोच पावती**

बँक/ट्रेझरी/सब ट्रेझरीचे नाव :
पत्ता :

पावतीचा अनुक्रमांक :

तारीख :

------- ह्यांचेकडून (सादरकर्त्याचे नाव व पत्ता) मिळालेल्या, खाली वर्णन केलेल्या नोटा खोट्या असल्याने त्या जप्त करुन त्यावर शिक्का मारण्यात आल्या आहेत.

| खोटी ठरविण्यात आलेल्या नोटेचा अनुक्रमांक | मूल्य | नोट खोटी ठरविण्यात आल्याचे लक्षण |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |

खोट्या नोटांची एकूण संख्या :

(सादरकर्त्याची सही) (काऊंटरवरील कर्मचा–याची सही)

(कार्यालयाचे सील)

**जोडपत्र 3**
**(परिच्छेद 5)**

तारीख ___________

बँकचे नाव :
जिल्हा :
नोडल ऑफिसरचे नाव व पत्ता :
संदर्भ क्रमांक :

वरिष्ठ पोलिस अधिकारी,
____________पोलिस ठाणे

**महिन्यासाठीचा एकत्रीकृत मासिक अहवाल** ____________________________________________________

खोट्या नोटेचा तपशील :

| सापडल्याची तारीख | शाखा/करन्सी चेस्टचे नाव | टेंडरर ची माहिती | मूल्य/नग/अनुक्रमांक | उल्लंघित सुरक्षा लक्षणे | एनसीआरबी पोर्टल ने जनरेट केलेला युआरएन |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

(4) माहिती आणि कारवाई साठी खोट्या नोटा सोबत जोडल्या आहेत.
(5) कृपया पोच द्यावी

(प्राधिकृत स्वाक्षरीकर्ता)

(कार्यालयाचे सील)

सोबत :

**जोडपत्र 4**
**(परिच्छेद 5)**

दिनांक : _________

बँकेचे नाव :
जिल्हा :
नोड्ल बँक अधिकाऱ्याचे नाव व पत्ता :
संदर्भ क्र.

वरिष्ठ पोलिस अधिकारी,
___________पोलिस ठाणे

प्रिय महोदय,

**खोट्या चलनी नोटा सापडणे – चौकशीबाबत विनंती**

________________रोजी आमच्या कार्यालयात सापडलेल्या पुढील खोट्या चलनी नोटा आम्ही ह्यासोबत जोडत आहोत. त्या सादर करणाराचा तपशील खाली दिला आहे.

2.भारतीय दंड संहितेच्या कलम 489अ ते 489ई खाली नकली नोटा छापणे आणि/किंवा त्यांचा प्रसार करणे हा एक गुन्हा असल्याने, आम्ही एफआयआर दाखल करुन, आवश्यक तो तपास करुन गुन्हेगाराला शिक्षा करण्याची विनंती करत आहोत. ह्याबाबात कोर्टामध्ये फौजदारी गुन्हा दाखल करण्याचे ठरविल्यास, कोड ऑफ क्रिमिनल प्रोसिजरच्या कलम 292(1) व 292(3) मधील तरतुदीनुसार, आपण त्या नोटा, आधी कोणत्याही नोट-छपाई करणाऱ्या छापखान्यात किंवा फोरेन्सिक प्रयोगशाळेत पाळवू शकता. तज्ञांनी त्याबाबत दिले गेलेले मत, क्रिमिनल प्रोसिजर कोडच्या 292 खाली, पुरावा म्हणून कोर्टात सादर केले जाऊ शकते. आपला तपास पूर्ण झाल्यावर आणि/किंवा कोर्टाची कारवाई पूर्ण झाल्यावर, ह्या नोटा, तपासाच्या/कोर्ट निर्णयाच्या सविस्तर अहवालासह आमच्याकडे परत केल्या जाव्यात.

| मूल्ये/नगांची संख्या | अनुक्रमांक | अपेक्षित मूल्य | टेंडरर ची माहिती | जेथे मिळाल्या त्या शाखेचे/करन्सी चेस्टचे नाव व पत्ता | बँकेची एंट्री क्र. | एनसीआरबी पोर्टल ने जनरेट केलेला युआरएन |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

(3) खोट्या नोटा सोबत जोडल्या आहेत.
(4) कृपया पोच द्यावी.

आपला
(प्राधिकृत स्वाक्षरीकर्ता)
(कार्यालयाचे सील)
सोबत :

**जोडपत्र 5**
**(परिच्छेद क्र. 8)**

**<u>खोट्या नोटा सावधानता कक्षा कडून (एफएनव्हीसी) रिझर्व्ह बँकेला, पत्ता इत्यादि तपशील पाठविण्याचा नमुना</u>**

(प्रत्येक वर्षी 1 जुलैला ई-मेलने पाठविला जावा )
*संदर्भ - आरबीआयने दिलेले जुलै 1, 2012 चे महापरिपत्रक*

| बँकेचे नांव | एफएनव्हीसीचा पत्ता (पिन कोड सह) | प्रभारी अधिकाऱ्याचे नांव व हुद्दा | टेलिफोन नं. (कोड सह) | फॅक्स नंबर (कोड सह) | एफ एन व्ही सी चा ई-मेल पत्ता |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

वरील तपशीलात काही बदल झाल्यास तो आम्ही ताबडतोब कळवू.

प्राधिकृत अधिकाऱ्याचे नांव :
हुद्दा :
तारीख :
सूचना : हा नमुना, एमएस-एक्सेलमध्ये संपूर्णपणे भरुन, ई-मेलने पुढील पत्त्यावर पाठवावा :

**<u>(कोणतीही हार्ड कॉपी पाठवू नये)</u>**.

**जोडपत्र 6**
**(परिच्छेद क्र. 10)**
दिनांक : _________

बँक शाखेचे नांव व पत्ता :

___________महिन्यात ___________ ठिकाणी सापडलेल्या नकली बँक नोटांचा तपशील देणारे विवरणपत्र,

**(अ) मिळालेल्या खोट्या नोटांचा तपशील**

| **शाखा/करन्सी चेस्टचे नाव** | **सापडण्याचा प्रकार** | **नग आणि मूल्यनिहाय तपशील** | | | | | | | | | | | | | **एकूण नग** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | एफआयआर (एफआयसीएन भाग) | 10 जुन्या | 10 नव्या | 20 जुन्या | 20 नव्या | 50 जुन्या | 50 नव्या | 100 जुन्या | 100 नव्या | 200 | 500 जुन्या | 500 | 1000 | 2000 | |
| | नॉन-एफआयआर (एफआयसीएन भाग) | | | | | | | | | | | | | | |
| | मिळालेल्या नोटांचे भाग | | | | | | | | | | | | | | |

**(ब) पोलिसांकडे दाखल केलेल्या प्रकरणांचा तपशील**

| | महिन्याच्या सुरुवातीस पोलिसांकडे प्रलंबित | अहवालाखाली ह्या महिन्यात पोलिसांकडे पाठविलेली | महिन्यामध्ये पोलिसांनी परत केलेली | महिनाअखेर पोलिसांकडे प्रलंबित (एकुण) |
|---|---|---|---|---|
| प्रकरणांची संख्या * जेथे एफआयआर फाईल केला | | | | |
| एफआयआर च्या एकुण खोट्या नोटांच्या भागांची संख्या | | | | |

* दाखल केलेला प्रत्येक एफआयआर म्हणजेच एक प्रकरण.

पुढीलप्रमाणे पाठविण्यात आले :
(1) महाव्यवस्थापक/उप-महाव्यवस्थापक भारतीय रिझर्व्ह बँक, इश्यु डिपार्टमेंट, ________________

(सही)
प्राधिकृत अधिकाऱ्याचे नांव व पदनाम
कार्यालयाचे सील

जोडपत्र 7
(परिच्छेद 12)

1967 पासून रिझर्व्ह बँकेने प्रसारित केलेल्या बँक नोटांची डिझाइन्स

| वर्ष | आकार | वॉटरमार्क | दर्शनी बाजू | मागील बाजू |
|---|---|---|---|---|
| 1.रु.10 च्या नोटा | | | | |
| 1967 | 137 x 63 मि.मी. | अशोक स्तंभ | जांभळा रंग, मध्यभागी 10 हा अंक | नोटेचे मूल्य 14 भाषात. अर्धवर्तुळात समुद्र व नावेचा देखावा. |
| 1968 | –' ' – | –' ' – | काळा-निळा रंग, वचननामा, गॅरंटी क्लॉज, आणि दोन भाषात सही | वरीलप्रमाणे अधिक आरबीआयचे नाव हिंदीत. |
| 1969 | –' ' – | –' ' – | काळा-निळा रंग, 'रुपीज टेन' ऐवजी 'टेन रुपीज', | महात्मा गांधीचे चित्र. |
| 1970 | –' ' – | अशोक स्तंभ व चरखा | आरबीआय हे शब्द हिंदीच्या जागी इंग्रजीत व इंग्रजीच्या जागी हिंदीत, गॅरंटी क्लॉज हिंदीत, वचननामा व गव्हर्नरची सही ह्यात अदलाबदल, सत्यमेव जयते वॉटरमार्क व अंक खिडकी मोठी केलेली | द्विभाषिक सील घालण्यात आले. |
| 1975 | –' ' – | –' ' – | दाट तपकिरी, अंबर व निळा रंग, "10" हा अंक दाट तपकिरी रंगात, इंताग्लिओ छपाई, डावीकडे भाषांचा स्क्रोल आणि उजवीकडे अशोक स्तंभ | फिक्कट तपकिरी, ऑकर निळा व हिरवा रंग, एका झाडाच्या फांदीवर दोन मोर असलेले वर्तुळ, हरीण, घोडे, पक्षी व कमळ. |
| 1992 | –' ' – | –' ' – | सर्वसाधारणत: फिकट गुलाबी, मजेंटा व पिवळा रंग | शालिमार गार्डन. |
| 1996 | –' ' – | वॉटरमार्कच्या खिडकीत अनेक दिशांना जाणाऱ्या रेषा व त्यात महात्मा गांधीचे चित्र, | मॉव्ह तपकिरी, नारंगी व गुलाबी रंग, महात्मा गांधीचे चित्र अंगभूत सुरक्षा धागा व त्यावर 'भारत RBI' 'अक्षरे, प्रकाशासमोर धरल्यावर दोन्हीही बाजूंनी वाचता येतात, | गुंतागुंतीचे गिलोक व पुष्पांचे डिझाईन, त्यात हत्ती, गेंडा व वाघाचे चेहरे. नोटेचे मूल्य 15 भाषात. |
| 2006 | –' ' – | महात्मा गांधीचे चित्र, बहुदिशीय रेषा आणि 10 हे मूल्य ह्या बाजूवर आहेत आणि नोट उजेडाकडे धरल्यास ते चांगले दिसून येतात, | केवळ मशीनने वाचता येण्यासारखा, स्वच्छ अक्षरांचा मॅग्नेटिक धागा, त्यावर भारत व आरबीआय हे शब्द युव्ही प्रकाशात दोन्हीही बाजूस पिवळे दिसतात. रुंदी 1.4 मि.मी. दोन रंगांमधील ऑप्टिकल फायबर्स, दर्शनी बाजूवरील (रिकाम्या) व मागील बाजूवरील (भरलेल्या) मध्यभागावरील, वॉटरमार्क जवळील उभ्या पट्यामधील छोटे फुलांचे डिझाईन मागून व पुढून तंतोतंत जुळते. त्यामुळे प्रकाशाविरुद्ध नोट धरल्यास तो अंक एकच असल्याचे दिसते | बँक नोटेच्या मागच्या बाजूस प्रिंटिंग स्टेजमध्येच त्या नोटेचे वर्ष छापलेले आहे. |
| 2011 | (वरील प्रमाणे) | (वरील प्रमाणे) | वरील प्रमाणे ह्याशिवाय नोटेच्या दर्शनी बाजूवर सर्वात वरच्या डाव्या व उजव्या कोप-यावर (मूल्य अंकाबरोबर) ₹ चिन्ह टाकले आहे) | (नोटेच्या मागच्या बाजूवर छपाईचे वर्ष असणे सुरुच राहील, ह्याशिवाय, नोटेच्या वरच्या डाव्या व उजव्या कोप-यावर (मूल्य अंकाबरोबर) ₹ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | चिन्ह टाकले आहे). |
| 2016 | (वरील प्रमाणे) | (वरील प्रमाणे) | (वरील प्रमाणे)<br>ह्याशिवाय, ह्या बँक नोटांच्या दोन्हीही अंक फलकांमधील आकडे डावीकडून उजवीकडे वाढत्या आकाराचे असतील तर प्रथम तीन अंक अक्षरे (उपसर्ग - प्रिफिक्स) एकाच/समान आकाराचे असतील | |
| 2018 | 63 मि मि x 123 मिमि | महात्मा गांधीचे (नवीन) मालिका चित्र आणि 10 हा मूल्य दर्शविणारा इलेक्टोटाईप अंक (10) वॉटर मार्क | ह्या नोटेच्या पार्श्वभूमीचा रंग चॉकलेट ब्राऊन आहे. नोटेच्या दर्शनी तसेच मागील ह्या दोन्हीही बाजूंवर, सर्वकष रंगसंगतीला धरुन इतर डिझाईन्स भूमितीय आकृती आहेत.<br><br>मूल्यदर्शक अंक 10 असलेले आरपार दिसणारे रजिस्टर – मूल्यदर्शक अंक 10 देवनागरीमध्ये. मध्यभागी महात्मा गांधींचे चित्र, 'RBI', 'भारत ', 'INDIA' आणि '10' ही सूक्ष्म अक्षरे 'भारत' व RBI असे कोरलेले खिडकीयुक्त डिमेटॅलाईज्ड सुरक्षा धागा, गॅरंटी क्लॉज, वचननाम्यासह गव्हर्नरांची सही आणि RBI चिन्ह हे महात्मा गांधींच्या चित्राच्या उजवीकडे. तसेच, उजवीकडे अशोक स्तंभाचे चिन्ह, डावीकडील वरच्या बाजूस आणि उजवीकडील खालच्या बाजूस वाढत जाणा-या आकाराचे अंक असलेले अंक फलक. | नवीन नोटेच्या मागच्या बाजूवर, देशाचा सांस्कृतिक वारसा सांगणा-या कोनार्कच्या सूर्य मंदिराचे चित्र. डावीकडे, नोटेच्या छपाईचे वर्ष, स्वच्छ भारत लोगो व घोषणा, भाषा फलक व 10 हा मूल्यदर्शक अंक देवनागरीमध्ये |
| 2. रु. 20 च्या नोटा | | | | |
| 1972 | 147x 63 मि.मी. | अशोक स्तंभ | केशरी रंग, अशोक स्तंभाचे चित्र उजव्या बाजूस व भाषांचा तक्ता डाव्या बाजूस | आडव्या पॅनलमध्ये केंद्रभागी, दोन्ही बाजूंना कोपऱ्यात 20 हे अंक असून त्याच्या मध्ये ठळक हिंदी अक्षरे. विधानसभेचे चित्र, डावीकडे भारतीय भाषांमध्ये नोटेचे मूल्य. |
| 1975 | -' ' - | छोटा अशोकस्तंभ व फिरत्या चक्रांची साखळी, रेझिन प्रक्रिया केलेला कागद | लाल, निळा, मॉव्ह व फिकट पिवळा रंग, फिकट पिवळया कमळाच्या डिझाईनवर, गडद मॉव्ह रंगात 20 हा अंक, भाषांची यादी डावीकडे व अशोक स्तंभाचे चिन्ह उजवीकडे. छपाई सर्व बाजूंनी पसरलेली दिसते परंतु कोपऱ्यात मात्र मूळ पांढरा कागद दिसतो. नांवे, खंड व सही दोन भाषात | कोरडी ऑफसेट छपाई, लाल, निळा व मॉव्ह रंग, मध्यभागी कोणार्कच्या सूर्यमंदिराच्या रथाचे चक्र, फिकट निळया रंगातील वॉटरमार्क खिडकीभोवती अलंकारिक डिझाईन जे दुसऱ्या बाजूवरील डिझाईनशी तंतोतंत जुळते. |
| 2001 | -' ' - | महात्मा गांधीचे चित्र | 'भारत' (हिंदीमध्ये) व 'आरबीआय' हे शब्द असलेला संपूर्णपणे अंगभूत असलेला सुरक्षा धागा. रंग ठळकपणे लालसर नारिंगी. अशोक स्तंभाच्या जागी दाट लाल रंगात महात्मा गांधीचे चित्र, तर अशोक स्तंभ, तळाच्या डावीकडील कोपऱ्यात ठेवलेला आहे व | मध्यभागी छापलेल्या देखाव्यात, नारळीचे बन असलेली किनारपट्टी आहे. डावीकडील बाजूस असलेल्या उभ्या पॅनलमध्ये, ह्या नोटेचे मूल्य 15 भाषात दिले आहे. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | आकारही छोटा आहे. महात्मा गांधीचे चित्र, आरबीआय ही अक्षरे, गॅरंटी व प्रॉमिस क्लॉज, गव्हर्नरची सही आणि अशोक स्तंभाचा इनसेट हे इंताग्लिओमध्ये आहेत. महात्मा गांधीच्या चित्रामागे आरबीआय हा शब्द आणि सूक्ष्म असा 20 हा अंक आलटून पालटून दिसतात. ह्या नोटेचे मूल्य अंध व्यक्तींना कळण्यास मदत होण्यासाठी, एक छोटा उभा आयत, उठावदार स्वरुपात नोटेच्या डाव्या बाजूला ठेवला आहे. नंबर पॅनलमधील अंक लाल रंगात छापले आहेत | |
| 2006 | –*- | महात्मा गांधीचे चित्र, बहुदिशीय रेषा आणि 20 हा मूल्य दर्शविणारा इलेक्टोटाईप अंक ह्या भागावर दिसतात आणि नोट प्रकाशाविरुद्ध धरल्यावर अधिक स्पष्टपणे दिसतात | मशीनने वाचता येण्यासारखा, खिडक्या असलेला, डिमेटॅलाइजड स्पष्ट मजकूर असलेला – 'भारत' (हिंदीत) व आरबीआय –युव्ही प्रकाशात (जेनेटिक) दोन्ही बाजूंनी पिवळया स्फुर रंगात दाखवणारा सुरक्षा धागा, रुंदी 1.4 मिमी, दोन रंगातील ऑप्टिकल फायबर्स, दर्शनी बाजूवरील (रिकाम्या) व मागील बाजूवरील (भरलेल्या) मध्यभागावरील, वॉटरमार्क जवळील उभ्या पट्यामधील छोटे फुलांचे डिझाईन मागून व पुढून तंतोतंत जुळते. त्यामुळे प्रकाशाविरुद्ध नोट धरल्यास तो अंक एकच असल्याचे दिसते | बँक नोटेच्या मागच्या बाजूवर प्रिंटिंग स्टेजमध्येच त्या नोटेचे वर्ष छापलेले आहे |
| 2012 | (वरील प्रमाणे) | (वरील प्रमाणे) | ्ङ्मनोटेच्या दर्शनी बाजूवरील वरच्या डाव्या व उजव्या कोप–यात (मूल्य अंकाबरोबर) ₹ चिन्ह टाकले आहे) | (नोटेच्या मागच्या बाजूवर छपाईचे वर्ष छापणे सुरुच राहील. नोटेच्या मागील बाजूवरील वरच्या डाव्या व उजव्या कोप–यात (मूल्य अंकाबरोबर) ₹ चिन्ह टाकले आहे) |
| 2016 | (वरील प्रमाणे) | (वरील प्रमाणे) | दोन्हीही अंक फलकांमधील अंक डावीकडून उजवीकडे वाढत्या आकाराचे असतील तर प्रथम तीन अंकाक्षरे (प्रिफिक्स) एकसमान आकाराची असतील.<br>ऋऋ आतापर्यंत इंताग्लिओ (उठावदार) छपाईमध्ये छापण्यात येणारे, '20' हा अंक, आरबीआयचे सील, महात्मा गांधींचे चित्र, आरबीआय लिजेंड, हमी व वचननामा, गव्हर्नरांची सही, अशोक स्तंभाचे चिन्ह ह्या गोष्टी आता ऑफसेटने (उठावदार छपाई नव्हे) छापण्यात येत आहेत.<br>ह्याशिवाय, ह्या बँक नोटेच्या डावीकडील आयताकार ओळख चिन्ह काढून टाकण्यात आले आहे.<br>मागील बाजूवरील रंगामध्ये बदल केलेला नसला तरी दर्शनी बाजूवरील रंग हलका (इंताग्लिओ छपाई काढून टाकण्यात आल्याने) आहे. | ` |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | महात्मा गांधींच्या चित्राच्या उजवीकडील उभ्या पट्टीमध्ये आतापर्यंत, ‘20’ हा मूल्यदर्शक अंक दर्शविणारी एक सुप्त प्रतिमा होती. ही सुप्त प्रतिमा, केवळ ती नोट डोळयांच्या पातळीत आडवी धरल्यावरच दिसू शकत होती. हे लक्षण आता काढून टाकण्यात आले आहे. ऋऋ<br>20 ह्या मूल्यदर्शक अंकासह आरपार दिसणारे रजिस्टर, 20 हा मूल्यदर्शक अंक देवनागरीमध्ये. मध्यभागी महात्मा गांधींचे चित्र 'RBI', ‘भारत ', ‘INDIA' व ‘20’ही सूक्ष्म अक्षरे ठभारत]़ व RBI ही अक्षरे असलेला खिडकीयुक्त डिमेटॅलाईज्ड सुरक्षा धागा, महात्मा गांधींच्या चित्राच्या उजवीकडे गॅरंटी क्लॉज, वचननाम्यासह गव्हर्नरांची सही आणि आरबीआय चिन्ह, महात्मा गांधींचे चित्र व इलेक्ट्रोटाईप (20) वॉटर मार्क्स. डावीकडील वरच्या बाजूस व उजवीकडील खालच्या बाजूस असलेल्या अंक फलकामध्ये वाढत जाणा-या आकारातील अंक | |
| 2019 | 63x129मिमि | महात्मा गांधीचे (नवीन) मालिका चित्र आणि 20 हा मूल्य दर्शविणारा इलेक्टोटाईप अंक (20) वॉटर मार्क | आतापर्यंत इंताग्लिओ (उठावदार) छपाईमध्ये छापण्यात येणारे, ‘20’ हा अंक, आरबीआयचे सील, महात्मा गांधींचे चित्र, आरबीआय लिजेंड, हमी व वचननामा, गव्हर्नरांची सही, अशोक स्तंभाचे चिन्ह ह्या गोष्टी आता ऑफसेटने (उठावदार छपाई नव्हे) छापण्यात येत आहेत.<br>ह्याशिवाय, ह्या बँक नोटेच्या डावीकडील आयताकार ओळख चिन्ह काढून टाकण्यात आले आहे.<br>मागील बाजूवरील रंगामध्ये बदल केलेला नसला तरी दर्शनी बाजूवरील रंग हलका (इंताग्लिओ छपाई काढून टाकण्यात आल्याने) आहे.<br>महात्मा गांधींच्या चित्राच्या उजवीकडील उभ्या पट्टीमध्ये आतापर्यंत, ‘20’ हा मूल्यदर्शक अंक दर्शविणारी एक सुप्त प्रतिमा होती. ही सुप्त प्रतिमा, केवळ ती नोट डोळयांच्या पातळीत आडवी धरल्यावरच दिसू शकत होती. हे लक्षण आता काढून टाकण्यात आले आहे. | डावीकडे, नोटेच्या छपाईचे वर्ष, स्वच्छ भारत लोगो व घोषणा, भाषा फलक, एलोरा गुंफांचे चित्र, 20 हा मूल्यदर्शक अंक देवनागरीमध्ये. |
| 3. रु. 50 च्या नोटा | | | | |
| 1975 | 147 x 73 मिमी | चक्रांच्या मालिकेसह अशोक स्तंभ | निळया, हिरव्या व जांभळया रंगांच्या छटांसह मॉव्ह रंग. 50 हा अंक गडद तपकिरी. डावीकडे भाषांचा तक्ता व उजवीकडे अशोक स्तंभाचे चिन्ह. फक्त कोपरे सोडल्यास सर्व | मॉव्ह, तपकिरी व पिवळा रंग. मध्यभागी विधानसभा. वॉटरमार्कची खिडकी फिक्या मॉव्ह रंगात असून त्याच्या सभोवती अलंकारिक डिझाईन असून ते मागून-पुढून तंतोतंत जुळते. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | बाजूस छपाई पसरलेली दिसते. | |
| 1981 | –' \` – | –' \` – | इंताग्लिओ–फास्ट निळा, पिवळा लाल, अशोक स्तंभ आणि भाषा गडद जांभळ्या रंगात, उरलेला भाग गडद हिरव्या व तपकिरी रंगात. अशोक स्तंभ चिन्हाखाली खुणा सत्यमेव जयते | ड्राय ऑफ्सेट–पिवळट तपकिरी आणि अंगभूत दाट जांभळा रंग. राष्ट्रध्वजासह विधान सभेचे चित्र. |
| 1997 | –' \` – | खिडकीत महात्मा गांधींचे चित्र व त्यासह बहुदिशीय रेषा | पिवळा, निळा व जांभळा रंग, अशोक स्तंभाऐवजी महात्मा गांधींचे निळया रंगात चित्र, सुरक्षा धागा नोटेच्या संपूर्णपणे आत व त्यावर आरबीआय व 'भारत' चिन्हे. अंध व्यक्तिंना नोटेचे मूल्य समजण्यासाठी, वॉटरमार्कच्या डाव्या बाजूस छोटा भरीव काळा चौरस | भारताच्या विधानसभेचे विहंगम दृष्य व सभोवार फुलांचे व बाजूंना फिलिग्री डिझाईन, नोटेचे मूल्य 15 भाषांमध्ये. |
| 2005 | –' \` – | ह्या भागात महात्मा गांधींचे चित्र, बहुदिशीय रेषा व ह्या नोटेचे 50 हे मूल्य दर्शविणारी इलेक्ट्रोटाईप खूण दिसते व हे सगळे नोट प्रकाशाच्या विरुद्ध धरल्यास अधिक चांगली दिसते | मशीनने वाचता येण्यासारखा, खिडक्या असलेला, डिमेटॅलाइजड स्पष्ट मजकूर असलेला 'भारत' (हिंदीत) व आरबीआय – युव्ही प्रकाशात दोन्ही बाजूंनी स्फुर पिवळया रंगात चमकणारा मॅग्नेटिक सुरक्षा धागा. रुंदी 1.4 मिमी. हिंदी व इंग्रजीत छापलेले बँकेचे नांव, रिझर्व्ह बँकेचे सील, गॅरंटी आणि वचननामा, डावीकडील अशोक स्तंभाचे चिन्ह, आरबीआयच्या गव्हर्नरची सही, हे इंताग्लिओ, म्हणजे उठावदार छपाईत दिले आहे. वॉटरमार्कच्या खिडकीच्या डाव्या बाजूस, अंध व्यक्तींना नोटेचे मूल्य समजावे ह्यासाठी, इंताग्लिओ छपाईत एक छोटा व खोल चौरस दिला आहे. ऑप्टिकल फायबर्स दोन रंगात आहेत. दर्शनी बाजूवरील (रिकाम्या) व मागील बाजूवरील (भरलेल्या) मध्यभागावरील, वॉटरमार्क जवळील उभ्या पट्ट्यामधील छोटे फुलांचे डिझाईन मागून व पुढून तंतोतंत जुळते. त्यामुळे प्रकाशाविरुद्ध नोट धरल्यास तो अंक एकच असल्याचे दिसते | बँक नोटेच्या मागच्या बाजूस प्रिंटिंग स्टेजमध्ये छपाईचे वर्ष दिले आहे. |
| 2012 | –' \` – | –' \` – | झ्नोटेच्या दर्शनी बाजूवरील वरच्या डाव्या व उजव्या कोप–यात (मूल्य अंकाबरोबर) ₹ चिन्ह टाकले आहे) | (नोटेच्या मागच्या बाजूवर छपाईचे वर्ष छापणे सुरुच राहील. नोटेच्या मागील बाजूवरील वरच्या डाव्या व उजव्या कोप–यात (मूल्य अंकाबरोबर) ₹ चिन्ह टाकले आहे) |
| 2015 | –' \` – | –' \` – | –' \` –<br>ह्याशिवाय, ह्या बँक नोटांच्या दोन्हीही अंक फलकांमधील आकडे डावीकडून उजवीकडे वाढत्या आकाराचे असतील तर प्रथम तीन अंक अक्षरे (उपसर्ग - प्रिफिक्स) एकाच/समान आकाराचे | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | असतील. | |
| 2016 | –’ ‵ – | –’ ‵ – | आतापर्यंत इंताग्लिओ (उठावदार) छपाईमध्ये छापण्यात येणारे, ‘50’ हा अंक, आरबीआयचे सील, महात्मा गांधींचे चित्र, आरबीआय लिजेंड, हमी व वचननामा, गव्हर्नरांची सही, अशोक स्तंभाचे चिन्ह ह्या गोष्टी आता ऑफसेटने (उठावदार छपाई नव्हे) छापण्यात येत आहेत.<br>ह्याशिवाय, ह्या बँक नोटेच्या डावीकडील चौरस आकाराचे ओळख चिन्ह काढून टाकण्यात आले आहे.<br>मागील बाजूवरील रंगामध्ये बदल केलेला नसला तरी दर्शनी बाजूवरील रंग हलका (इंताग्लिओ छपाई काढून टाकण्यात आल्याने) आहे.<br>महात्मा गांधींच्या चित्राच्या उजवीकडील उभ्या पट्टीमध्ये आतापर्यंत, ‘50’ हा मूल्यदर्शक अंक दर्शविणारी एक सुप्त प्रतिमा होती. ही सुप्त प्रतिमा, केवळ ती नोट डोळ्यांच्या पातळीत आडवी धरल्यावरच दिसू शकत होती. हे लक्षण आता काढून टाकण्यात आले आहे. | |
| 2017 | 66 मिमि x 135 मिमि | महात्मा गांधीचे (नवीन) मालिका चित्र आणि 50 हा मूल्य दर्शविणारा इलेक्टोटाईप अंक (50) वॉटर मार्क | ह्या नोटेच्या पार्श्वभूमीचा रंग फ्लुरोसंट निळा आहे.<br>मूल्यदर्शक अंक 50 असलेले आरपार दिसणारे रजिस्टर – मूल्यदर्शक अंक 10 देवनागरीमध्ये. मध्यभागी महात्मा गांधींचे चित्र, 'RBI', ‘भारत ', ‘INDIA' आणि '50' ही सूक्ष्म अक्षरे ‘भारत’ व RBI असे कोरलेले खिडकीयुक्त डिमेटॅलाईज्ड सुरक्षा धागा, गॅरंटी क्लॉज, वचननाम्यासह गव्हर्नरांची सही आणि RBI चिन्ह हे महात्मा गांधींच्या चित्राच्या उजवीकडे. तसेच, उजवीकडे अशोक स्तंभाचे चिन्ह, डावीकडील वरच्या बाजूस आणि उजवीकडील खालच्या बाजूस वाढत जाणा–या आकाराचे अंक असलेले अंक फलक. | डावीकडे, नोटेच्या छपाईचे वर्ष, स्वच्छ भारत लोगो व घोषणा, भाषा फलक, रथासह हंपीचे चित्र, 50 हा मूल्यदर्शक अंक देवनागरीमध्ये. |
| 4. रु. 100 च्या नोटा | | | | |
| 1967 | 157x73 मिमी | अशोक स्तंभ | निळा रंग. 100 हा अंक मध्यभागी ठळकपणे दिसतो. उजव्या बाजूस अशोक स्तंभाचे चिन्ह | डावीकडे 14 भारतीय भाषा. एका गोलाकार फ्रेममध्ये हिराकुड धरणाचे चित्र. |
| 1969 | –’ ‵ – | –’ ‵ – | निळा रंग आणि वचननामा, गॅरंटी क्लॉज व गव्हर्नरची सही दोन भाषात | गोलाकार फ्रेममध्ये, सेवाग्राम आश्रमाच्या पार्श्वभूमीवर बसलेल्या महात्मा गांधीचे चित्र. |
| 1975 | –’ ‵ – | फिरती चक्रे असलेला अशोक स्तंभ | निळा, तपकिरी, गुलाबी व गडद छटांसह इंताग्लिओ गडद निळा 100 हा अंक दाट निळा, वॉटरमार्कची खिडकी फिकट निळया रंगात. | इंताग्लिओ गडद निळा आणि मक्याची तपकीरी रंगछटा, शेतकीच्या कार्यकृती, चहाचे मळे व जलविद्युत ऊर्जा प्रकल्प. वॉटरमार्कच्या खिडकी |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | आरबीआयचे नांव, वचननामा, गॅरंटी क्लॉज व गव्हर्नरची सही दोन भाषात. डावीकडे भाषांचा स्क्रोल व उजवीकडे अशोक स्तंभाचे चिन्ह. कोपरे सोडल्यास सर्व बाजूंना छपाई पसरलेली वाटते | सभोवार अलंकारिक डिझाईन व ते मागच्या बाजूवरील तशा डिझाइनशी तंतोतंत जुळते. |
| 1979 | -' ' - | फिरती चक्रे असलेला अशोक स्तंभ | एका बाजूस इंताग्लिओ निळा, लाल व दाट हिरवा रंग. लालसर व पिवळट हिरव्या रंगांच्या छटा. अशोक स्तंभाच्या चित्राखाली सत्यमेव जयते चिन्हे. | ड्राय-ऑफसेट, काळा व किरमिजी रंग, हिरवट निळया व तपकिरी छटांमधील डिझाईन. |
| 1996 | -' ' - | वॉटरमार्कच्या खिडकीत बहुदिशीय रेषांसह महात्मा गांधीचे चित्र. | ऑफसेट व इंताग्लिओ प्रक्रियेची छपाई. मुख्यत्वेकरुन निळा, करडा व हिरवा रंग, संपूर्णपणे आत असलेला परंतु अंशत: समोरील बाजूने दिसणारा खिडक्या असलेला सुरक्षा धागा. ह्या धाग्यावर आरबीआय व 'भारत' ही अक्षरे छापलेली आहेत. अंध व्यक्तींना ह्या नोटेचे मूल्य समजण्यासाठी वॉटरमार्कच्या डावीकडे एक छोटा भरीव काळा त्रिकोण. | मध्यभागी, वरच्या बाजूस फुलांचे डिझाईन व बाजूंना फिलिग्रीचे डिझाईन असलेले कांचनगंगा पर्वतराजीचे दृष्य. डाव्या बाजूस नोटेचे मूल्य 15 भाषात दिलेले आह |
| 2005 | -' ' - | महात्मा गांधीचे चित्र, बहुदिशीय रेषा आणि 100 हा अंक इलेक्ट्रोटाईपमध्ये असलेले ह्या भागात दिसते आणि हे सर्व, नोट प्रकाशाविरुद्ध धरल्यास अधिक स्पष्टपणे दिसते | रु. 100 च्या नोटेवर खास कलर शिफ्टसह, केवळ मशीनने वाचता येण्यासारखा व डिमेटॅलाइजड स्वच्छ मजकूर असलेला 'भारत' (हिंदीमध्ये) व आरबीआय लिहिलेला मॅग्नेटिक सुरक्षा धागा, निरनिराळ्या कोनांमधून पाहिल्यास ह्या धाग्याचा रंगही हिरव्या ऐवजी निळा दिसतो. युव्ही प्रकाशात, मागच्या बाजूला पिवळया स्फुरद रंगात तर पुढच्या बाजूस मजकूर स्फुरद रंगात दिसतो. रुंदी 2 मिमी.<br><br>इंताग्लिओ, म्हणजे उठावदार छपाई, बँकेचे हिंदी व इंग्लिश नांव, रिझर्व्ह बँकेचे सील, गॅरंटी व वचननामा, डावीकडील अशोक स्तंभाची खूण व आरबीआयच्या गव्हर्नरची सही ह्यात अधिक ठळक आहे. अंध व्यक्तींना ह्या नोटेचे मूल्य ओळखता येण्यासाठी, वॉटरमार्कच्या खिडकीच्या डावीकडे, अधिक खोल असलेला इंताग्लिओ छपाईमधील एक त्रिकोण ठेवला आहे. ऑप्टिकल फायबर्स दोन रंगात आहेत. समोरील बाजूवर (पोकळ) व मागील (भरलेल्या) बाजूवर, वॉटरमार्कच्या खिडकी शेजारील उभ्या पट्याच्या मध्यभागी असलेले फुलांचे डिझाईन, प्रकाशाविरुद्ध नोट धरल्यास मागून-पुढून तंतोतंत जुळते व अंक एकच दिसता | ह्या नोटेचे छपाईचे वर्ष प्रिंटिंग स्टेजमध्येच नोटेच्या मागच्या बाजूस दिलेले आहे. |
| 2011 | -' ' - | -' ' - | ड्नोटेच्या दर्शनी बाजूवरील वरच्या | (नोटेच्या मागच्या बाजूवर छपाईचे |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | डाव्या व उजव्या कोप-यात (मूल्य अंकाबरोबर) ₹ चिन्ह टाकले आहे) | वर्ष छापणे सुरुच राहील. नोटेच्या मागील बाजूवरील वरच्या डाव्या व उजव्या कोप-यात (मूल्य अंकाबरोबर) ₹ चिन्ह टाकले आहे) |
| 2015 | –' ` – | –' ` – | ह्याशिवाय, दोन्हीही अंक फलकातील अंक डावीकडून उजवीकडे मोठे होत जातील, तर पहिली तीन अल्फा-न्युमरिक चिन्हे (प्रिफिक्स) एकसमान आकाराची असतील) | वरीलप्रमाणेच. ह्याशिवाय, नोटांच्या दर्शनी बाजूवर, अंध व्यक्तींसाठी, नोट ओळखण्यासाठी, नोटेच्या डाव्या व उजव्या बाजूवर चार अँग्युलर ब्लीड लाईन्स असतील. ओळखण्याची खूण असलेल्या (त्रिकोणाचा) आकार 50 टक्के मोठा असेल |
| 2018 | 66× 142 मिमि | महात्मा गांधीचे (नवीन) मालिका चित्र आणि 100 हा मूल्य दर्शविणारा इलेक्टोटाईप अंक (100) वॉटर मार्क | 100 ह्या मूल्यदर्शक अंकासह आरपार दिसणारे रजिस्टर. 100 ह्या मूल्यदर्शक अंकासह सुप्त प्रतिमा, १०० हा मूल्यदर्शक अंक देवनागरीमध्ये. मध्यभागी महात्मा गांधींचे चित्र. 'RBI', 'भारत', 'India' ही सूक्ष्म अक्षरे भारत व RBI ही अक्षरे असलेला रंग बदलणारा खिडकीयुक्त सुरक्षा धागा. नोट तिरपी धरल्यास धाग्याचा रंग हिरव्या ऐवजी निळा असा बदलतो. महात्मा गांधींच्या चित्राच्या उजवीकडे गॅरंटी क्लॉज, गव्हर्नरांच्या सहीसह वचननामा आणि ङएक्ष् चिन्ह. उजवीकडे अशोक स्तंभाचे चिन्ह. महात्मा गांधींचे चित्र व (100) हा इलेक्ट्रोटाईप वॉटरमार्क. डावीकडील वरच्या बाजूस व उजवीकडील खालच्या बाजूस असलेल्या अंक फलकांमध्ये वाढत्या आकाराचे अंक. दृष्टीदोष असणारांसाठी, महात्मा गांधींचे चित्र, अशोक स्तंभ चिन्ह, सूक्ष्म अक्षरातील 100 असलेले त्रिकोणाकार चिन्ह आणि डाव्या तसेच उजव्या बाजूस चार तिरप्या ब्लीडलाईन्स हे सर्व इंताग्लिओ किंवा उठावदार छपाईमध्ये.<br>ह्या नोटच्या पार्श्वभूमीचा रंग चमकदार (ब्राईट) पिवळा आहे. दर्शनी तसेच मागील बाजूवर, नोटेच्या सर्वकष रंगसंगतीशी जुळणारी इतर डिझाईन्स व भूमितीय आकृती आहेत. | डावीकडे, नोटेच्या छपाईचे वर्ष, स्वच्छ भारत लोगो व घोषणा, भाषा फलक, रानी की वाव चे चित्र, 100 हा मूल्यदर्शक अंक देवनागरीमध्ये. |
| 5. रु. 200 च्या नोटा – महात्मा गांधीं (नवीन) मालिका | | | | |
| 2017 | 66 मिमि × 146 मिमि | महात्मा गांधीचे (नवीन) मालिका चित्र आणि 200 हा मूल्य दर्शविणारा इलेक्टोटाईप अंक (200) वॉटर मार्क | ह्या नोटच्या पार्श्वभूमीचा रंग चमकदार (ब्राईट) पिवळा आहे<br>दर्शनी तसेच मागील बाजूवर, नोटेच्या सर्वकष रंगसंगतीशी जुळणारी इतर डिझाईन्स व भूमितीय आकृती आहेत.<br><br>200 ह्या मूल्यदर्शक अंकासह सी थ्रु रजिस्टर. 200 ह्या मूल्यदर्शक अंकासह सुप्त प्रतिमा.<br>२०० हा मूल्यदर्शक अंक देवनागरीमध्ये. | मागील बाजूवर देशाच्या सांस्कृतिक वारसा सांगणारे सांची स्तुपाचे चित्र, डावीकडे, नोटेच्या छपाईचे वर्ष, घोषणेसह स्वच्छ भारत लोगो, भाषा फलक, सांची स्तुपाचे चित्र, 200 हा मूल्यदर्शक अंक देवनागरीमध्ये. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | मध्यभागी महात्मा गांधींचे चित्र. 'RBI', 'भारत', 'India' व '200' ही सूक्ष्म अक्षरे.<br>'भारत' व RBI लिहिलेला रंग बदलणारा खिडकीयुक्त सुरक्षा धागा. नोट तिरपी केल्यावर धाग्याचा रंग हिरव्या ऐवजी निळा असा बदलतो. महात्मा गांधींच्या चित्राच्या उजवीकडे गॅरंटी क्लॉज, वचननाम्यासह गव्हर्नरांची सही आणि आरबीआयचे चिन्ह. रुपयाच्या संकेतासह, रंग बदलणा-या शाईत (हिरवा ते निळा) रु. 200. उजवीकडे खालच्या बाजूस अशोक स्तंभ चिन्ह. डावीकडील वरच्या बाजूस व उजवीकडील खालच्या बाजूस असलेल्या अंक फलकात वाढत्या आकाराचे अंक. दृष्टीहीन/दृष्टीदोष असणारांसाठी, महात्मा गांधींचे चित्र, अशोक स्तंभ चिन्ह हे इंताग्लिओ किंवा उठावदार छपाईत, तसेच रु. 200 ह्या सूक्ष्म अक्षरासह क्त हे उठावदार ओळख चिन्ह, आणि डाव्या व उजव्या बाजूंवर 4 तिरप्या ब्लीड लाईन्स व लाईनींमध्ये दोन वर्तुळे हे देखील उठावदार छपाईत आहे. | |
| 6. रु. 500 च्या नोटा – महात्मा गांधी (नवीन) मालिका | | | | |
| 2016 | 66 मिमि x150 मिमि | महात्मा गांधीचे (नवीन) मालिका चित्र आणि 500 हा मूल्य दर्शविणारा इलेक्टोटाईप अंक (500) वॉटर मार्क | महात्मा गांधी (नवीन) मालिकेत देण्यात आलेल्या रु.500 च्या बँक नोटा, ह्या आधी विहित केलेल्या बँक नोट (एसबीएन) मालिकेपेक्षा रंग, आकार, विषय, सुरक्षा लक्षणांच्या जागा व डिझाईन ह्याबाबतीत निराळ्या आहेत.<br>नोटेचा रंग स्टोन ग्रे आहे.<br>महात्मा गांधींच्या चित्राची संबंधित स्थिती व ओरिएटेशेन बदलले आहे.<br>ह्या बँक नोटेत, दृष्टीहीनांनाही नोटेचे मूल्य ओळखण्यात यावे ह्यासाठीची लक्षणे ठेवण्यात आली आहेत (महात्मा गांधींचे चित्र, अशोक स्तंभ चिन्ह, ब्लीड लाईन्स, उजवीकडे रु.500 सह वर्तुळ व ओळख चिन्ह हे इंताग्लिओ छपाईत) . | नवीन विषय म्हणजे, भारतीय ध्वजासह लाल किल्ला हे भारतीय वारशाची जागा. मागील बाजूवर ' 2016' हे छपाईचे वर्ष व स्वच्छ भारत लोगो छापले आहे. मध्य भागाजवळ 15 भाषांचा फलक आहे. |
| 7. रु. 2000 च्या नोटा – महात्मा गांधी (नवीन) मालिका | | | | |
| 2016 | 66 मिमि x 166 मिमि | महात्मा गांधीचे (नवीन) मालिका चित्र आणि 2000 हा मूल्य दर्शविणारा इलेक्टोटाईप अंक (2000) वॉटर मार्क | महात्मा गांधी (नवीन) मालिकेत देण्यात आलेल्या -<br>ह्या नोटेचा बेस कलर मजंठा आहे. ह्या नोटेच्या दर्शनी व मागील बाजूवरील रंगसंगतीशी जुळणारी इतर डिझाईन्स व भूमितीय आकृती देखील आहेत.<br>मुख्य लक्षणे म्हणजे -<br>(1) मूल्यदर्शक अंक 2000 सह सी थ्रु | महत्वाची लक्षणे म्हणजे<br>(1) नोटेच्या छपाईचे वर्ष डाव्या बाजूस.<br>(2) घोषणेसह स्वच्छ भारत लोगो<br>(3) मध्य भागाजवळ भाषा फलक<br>(4) देशाचे, अंतराळात प्रथम प्रक्षेपण दर्शविणारे मंगलायनचे चित्र<br>(5) २००० हा मूल्यदर्शक अंक देवनागरीमध्ये. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | रजिस्टर.<br>(2) 2000 ह्या मूल्यदर्शक अंकासह सुप्त प्रतिमा.<br>(3) २००० हा मूल्यदर्शक अंक देवनागरीमध्ये.<br>(4) मध्यभागी महात्मा गांधींचे चित्र.<br>(5) बँक नोटेच्या डावीकडे 'RBI' व '2000' हे सूक्ष्म अक्षरात.<br>(6) 'भारत', RBI, 2000 लिहिलेला, रंग बदलणारा, खिडकीयुक्त सुरक्षा धागा. नोट तिरपी धरल्यास धाग्याचा रंग हिरव्याचा निळा असा बदलतो.<br>(7) उजव्या बाजूस, गॅरंटी क्लॉज, वचननाम्यासह गव्हर्नरांची सही आणि आरबीआय चिन्ह.<br>(8) उजवीकडील खालच्या बाजूस, रंग बदलणा-या शाईमध्ये (हिरवा ते निळा) रु. 2000 हा मूल्यदर्शक अंक रुपयाच्या चिन्हासह.<br>(9) महात्मा गांधींच्या चित्राच्या उजवीकडे अशोक स्तंभ चिन्ह व इलेक्ट्रोटाईप (2000) वॉटरमार्क्स.<br>(10) डावीकडील वरच्या बाजूस व उजवीकडील खालच्या बाजूस आकाराने लहानापासून मोठे होत जाणारे अंक असलेले अंक फलक. दृष्टीदोष असणारांसाठी, महात्मा गांधींचे चित्र, अशोक स्तंभ चिन्ह, ब्लीड लाईन्स व ओळखावयाचे चिन्ह ह्यांची छपाई इंताग्लिओ किंवा उठावदार प्रकारे.<br>(11) उजव्या बाजूस, उठावदार छपाईत रु. 2000 सह आडवा आयत.<br>(12) डाव्या व उजव्या बाजूस 7 तिरप्या ब्लीड लाईन्स उठावदार छपाईत. | |

**जोडपत्र 8**

## ह्या महापरिपत्रकात एकत्रित केलेल्या परिपत्रकांची यादी

| अनु क्र. | परिपत्रक संदर्भ क्रमांक | दिनांक | विषय | परिपत्रकाचा परिच्छेद |
|---|---|---|---|---|
| 1 | डीसीएम एफएनव्हीडी जी 16/16.01.01/2003-04 | 18-डिसेंबर-03 | एटीएममधून नकली नोटा दिल्या जाणे | परिच्छेद 6 |
| 2 | डीसीएम एफएनव्हीडी जी 31/16.01.01/2003-04 | 8-एप्रिल-04 | नकली नोटा ओळखणे – सादर करणारांना पावती देणे | परिच्छेद 4 |
| 3 | डीसीएम एफएनव्हीडी जी 3/16.02.03/2004-05 | 6-जुलै-04 | नकली नोटा ओळखणे -पावत्या देणे | परिच्छेद 4 |
| 4 | डीसीएम एफएनव्हीडी जी 23/16.01.01/2005-06 | 7-डिसेंबर-05 | एटीएममधून खोट्या नोटा दिल्या जाणे - खोट्या नोटा दक्षता कक्षाची स्थापना | परिच्छेद 6 & 8 |
| 5 | डीसीएम एफएनव्हीडी जी 37/16.08.08/2006-07 | 28-मार्च-06 | बँकांच्या एटीएम्समधील खोट्या नोटा ओळखणे | परिच्छेद 6 & 8 |
| 6 | डीसीएम एफएनव्हीडी जी 18/16.08.08/2006-07 | 1-जून-07 | बँकांकडून मिळालेल्या धनकोष प्रेषणांमधील खोट्या नोटा ओळखणे | परिच्छेद 6 |
| 7 | डीसीएम क्र.डीआयआर.एनपीडी. 3158/09.39.00/2009-10 | 19-नोव्हेंबर-09 | नोटांचे विलगीकरण -नोट सॉर्टिंग मशीन्स स्थापन करणे | परिच्छेद 6 |
| 8 | डीसीएम क्र. डीआयआर.एनपीडी. 3161/09.39.00 (पॉलिसी)/2009-2010 | 19-नोव्हेंबर-09 | नोटांचे विलगीकरण/प्रक्रिया -नोट सॉर्टिंग मशीन्स स्थापन करणे | परिच्छेद 9 |
| 9 | डीसीएम (आर अँड डी)क्र.जी -26/18.00.14/2009-10 | 11-मे-10 | नोट सॉर्टिंग मशीन्स स्थापन करणे - नोटांचे सत्यांकन व सुयोग्यता विलगीकरण पॅरामीटर्स | परिच्छेद 9 |
| 10 | डीसीएम एफएनव्हीडी क्र.502/16.01.05/2011-12 | 25-जुलै-11 | खोट्या बँक नोटा ओळखणे – सुधारित कार्यरीत | परिच्छेद 5 |
| 11 | डीसीएम (एफएनव्ही) क्र.5063/16.02.22/2011-12 | 9-मे-12 | खोट्या नोटा ओळखण्याची व कळविण्याची यंत्रणा -नाणेविषयक धोरण 2012-13 | परिच्छेद 6 |
| 12 | डीसीएम एफएनव्हीडी क्र.2165/16.21.005/2012-13 | 16-नोव्हेंबर-12 | खोट्या नोटा ओळखणे व कळविणे - नाणेविषयक धोरण 2012-13 च्या दुस–या तिमाहीचा आढावा | परिच्छेद 6 |
| 13 | डीसीएम एफएनव्हीडी क्र.776/16.01.05/2015-16 | 27-ऑगस्ट-15 | खोट्या नोटा ओळखणे -पुनरावलोकन | परिच्छेद 2 |
| 14 | डीसीएम एफएनव्हीडी क्र.1134/16.01.05/2016-17 | 27-ऑक्टोबर-16 | खोट्या नोटा ओळखणे व जप्त करणे | परिच्छेद 5 |
| 15 | डीसीएम (एफएनव्हीडी) जी-7/16.01.05/17-18 | 15-जानेवारी-18 | खोट्या नोटा ओळखणे व जप्त करणे - एफआयआर दाखल करणे. | परिच्छेद 5 |
| 16 | डीपीएसएस.सीओ.ओडी. क्र.916/06.07.011/2018-19 | 7-मार्च-2019 | भारतामधील व्हाईट लेबल एटीएम्स (डब्ल्युएलए) – मार्गदर्शक तत्वांचे पुनरावलोकन | परिच्छेद 6 |